सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- ०७ /२०२०**

**तक्रारकर्ता श्री. प्रविण दत्तात्रेय तळेकर**
ब्लॉक नं.१, साफल्य बिल्डिंग, पांडूरंगवाडी मार्ग क्र.२,
गोरेगाव (पू),मुंबई-४०० ०६३.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इवका), आर/दक्षिण,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग, स. व प. तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली (प), मुंबई ६७.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर/दक्षिण विभाग, स. व प. तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद क्र.२, कांदिवली (प), मुंबई ६७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०२.२०२०**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र.४३१४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र.११६७/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०१.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

३) "अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.
४) सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र.बीएम - ०७/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. ०३.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल आयोगाला १५ दिवसामध्ये सादर करावा. जन माहिती अधिकारी यांचार अहवाल प्राप्त झाल्यानंतर या तक्रार अर्जावर पुढील कारवाई कार्यालयामार्फत करण्यात यावी.

State Information Commission Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : ०३.०२.२०२०**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०७/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. प्रविण दत्तात्रेय तळेकर**
**सुनावणी दिनांक : २३.०४.२०२५ (In continuation of order dt ०३.०२.२०२०)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०४.०४.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकारणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने त्यांचा अहवाल आयोगाला १५ दिवसामध्ये सादर करावा. जन माहिती अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या तक्रार अर्जावर पुढील कारवाई कार्यालयामार्फत करण्यात यावी असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच, जन माहिती अधिकारी यांचा अहवाल आयोगास अप्राप्त आहे.

तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांच्या अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : २४.०४.२०२५**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०७/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. प्रविण दत्तात्रेय तळेकर**

**सुनावणी दिनांक : १६.०५.२०२५ (In continuation of order dt २४.०४.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही म्हणून तक्रार केलेली आहे. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांच्या अनुपालन अहवालासह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तक्रारकर्ता दि.०३.०२.२०२० व दि. २३.०४.२०२५ रोजीच्या सुनावणीस पण अनुपस्थित होते. त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यात स्वारस्य दिसून येत नाही.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २१.०५.२०२५**